दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष २ रे || अंक २१५ || शुक्रवार १९ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## वडकबाळ भोई गल्ली येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोहरम ताबुतचे विसर्जन

महेश पवार सोलापूर

वडकबाळ येथे पिर हाजरत लालसाब आली व पिर हाजरत मैला आली चे मोहरम मोठ्या आनंदात करण्यात आली या वेळी आग्नी तुडवणे व विविध कार्यक्रम करण्यात आले पिर हाजरत लालसाब आली चे पुजारी हाणमत भोई यांनी पिर हाजरत लालसाब आली व पिर हाजरत मैला आली ला सदल चढवण्यात आले त्या वेळी उपस्थित सरपंच माजी मलकारी पुजारी सरपंच विलास राठोड तंटामुक्त अध्यक्ष सरदार नगारे ग्राम पंचायत सदस्य सद्दाम शेख पोलिस पाटील अशोक पुजारी, युवा नेते सचिन बगले , ग्राम पंचायत सदस्य विनोद मुलगे माजी सरपंच रविकांत व्हनमाने, मानकरी वैभव मुलगे अध्यक्ष रमेश शिवशरण, शब्बीर नगारे भिमा घडेराव, माजी ग्रामपंचायत सदस्य ईलाई शेख,मल्लिनाथ पुजारी बेल्लिनाथ कोळी, सुभाष पुजारी, इक्बाल शेख,पिरसाहेब शेख ,आवदुत पुजारी ,रियाज शेख ,आरबाज शेख ,समीर शेख , बाला काळे ,भीमाशंकर भोई ,रमेश भोई ,सरवश बरूर , परशुराम बरूर , नागनाथ भोई ,विकास भोई चदु भोई, सागर भोई आशोक भोई दत्तात्रय भोई , उमेश राठोड, नामदेव राठोड , संतोष गोरे, अकाश कोळकुर ,नागनाथ भोई, अदि उपस्थित होते



## ज्येष्ठ समाजसेविका मेधा पाटकर यांची शिक्षा रद्द करण्याची मागणी

सोलापूर : ( सैफन शेख ) गेल्या ३८ वर्षापासून नर्मदा घाटीसह देशाच्या विविध भागात शेतकरी,श्रमिक , मजदूर,आदिवासी,ज्यांसाठी हे संपूर्ण आयुष्य वाहून घेतलेल्या नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर त्यांच्यावर लावलेले खोटे आरोप त्या अनुषंगाने दिलेली शिक्षा महामहीम राष्ट्रपती यांनी रद्द करण्याचे निर्देश त्वरित द्यावेत. याविषयीचे निवेदन जन आंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय बार्शी तालुक्यातील स्थानिक कार्यकर्ते आकाश दळवी यांनी आज तहसीलदार बार्शी यांना दिले.



निवेदन बार्शी तहसीलदार देतेवेळी (सहजीवन सेवाभावी संस्था संस्थेचे अध्यक्ष) बालाजी डोईफोडे,मकरोज बोकेफोडे (असंघटित कष्टकरी महासंघ बार्शी), दयानंद पिंगळे ( अण्णा हजारे भ.वि.ज.न्यास बार्शी),उमेश नेवाळे (युवक राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष (श.प.गट), विजय घोंगडे आदी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह जनआंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेधा पाटकर यांचे नर्मदा बचाव आंदोलन संपूर्ण देशात परिचित असून आज तागायत आदिवासी मजदूर शेतकरी आधी सर्व अन्यायग्रस्त विस्थापित यांच्या संघर्षाला धरून सुरू आहे आजही नर्मदा घाटी मध्ये हजारो परिवारांचे पुनर्वसन होणे शिल्लक असल्याने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांचे याविषयीचे आंदोलन सुरूच आहे. अशा परिस्थितीत सत्तेचा दुरुपयोग करून त्यांच्यावर खोटे आरोप लावून त्यांना शिक्षा देणे हे लोकशाही व संविधान मूल्यांचा विरोधात आहे. संपूर्ण कृत्य गैरकानुनी व अन्यायकारक असल्याने महामहीम राष्ट्रपती यांनी स्वतः त्वरित लक्ष घालून शासनास पाटकर यांना दिलेली शिक्षा निर्देशित करावी अशा आशयाचे निवेदन जनआंदोलन राष्ट्रीय समन्वयाचे बार्शी तालुका समन्वयक मनीष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

## लज्जास्पद! मंगळसूत्र गहाण ठेवूनसुद्धा मृतदेह देण्यास रुग्णालयाचा नकार

राजगड,माणुसकीला लाजवेल अशी घटना मध्य प्रदेशातील राजगढ जिल्ह्यातील कुरवली येथे मंगळवारी उघडकीस आली. रुग्णावर योग्य उपचार न करणे आणि रुग्णालयाच्या इमारतीला परवानगी न देणे यावरून आधीच वादात सापडलेल्या सुलभ रुग्णालयाचे डॉक्टर आणि संचालक डॉ.अभिषेक अग्रवाल यांनी रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांशी गैरवर्तन केल्याचे प्रकरण समोर आले आहे.रुग्णालयाने २४०० रुपयांसाठी मृतदेह दिला नाही

मंगळसूत्र गहाण म्हणून दिल्याचा आरोप पीडितेच्या कुटुंबीयांनी केला आहे. असे असतानाही योग्य उपचार न झाल्याने रुग्णाचा मृत्यू झाला. रुग्णाच्या मृत्यूनंतर रुग्णालय चालकाने २४०० रुपये जमा न केल्यास मृतदेह ताब्यात देण्यास नकार दिला. वाल्मिकी समाजाने रुग्णाच्या कुटुंबीयांसह कुरावार पोलीस स्टेशन प्रभारी यांच्याकडे तक्रार केली आहे.

काय आहे संपूर्ण प्रकरण

मजूर म्हणून काम करणाऱ्या प्रल्हादला अचानक आजारी पडल्यानं त्याच्या तोंडातून रक्त येऊ लागलं. त्यानंतर त्यांचा मुलगा वीरेंद्र याने त्यांना सुलभ हॉस्पिटलमध्ये दाखल केले. सतत २ तास उपचार सुरू असताना रुग्णालयाचे संचालक डॉ.अभिषेक अग्रवाल यांनी रुग्णाच्या कुटुंबीयांना आजार काय आहे हे सांगितले नाही. सायंकाळी चार वाजता प्रल्हादचा मृत्यू झाला.

प्रल्हादच्या मुलाने रुग्णालयाच्या संचालकाकडे वडिलांचा मृतदेह मागितला असता रुग्णालयाने मृतदेह देण्यास नकार देत आधी २४०० रुपये जमा करा नंतर मृतदेह देण्यात येईल, असे सांगितले.

याबाबत माहिती मिळताच आम्ही नगरसेवक प्रतिनिधी मोहन वर्मा, नगर परिषदेचे निरीक्षक संजू वाल्मिकी, रिंकू वाल्मिकी, महेश हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिषेक अग्रवाल यांच्याशी चर्चा केली असता, त्यांनीही त्यांच्याशी गैरवर्तन करून मृतदेह ताब्यात देण्यास नकार दिला. यानंतर कुटुंबीय व समाज बांधवांनी पोलीस स्टेशन प्रभारी यांना तक्रार अर्ज दिला. अखेर गोंधळानंतर रुग्णालय चालकाने मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात दिला.

पीडित कुटुंबीयांचे काय म्हणणे आहे? वडिलांची तब्येत अचानक बिघडल्याचे पीडित वीरेंद्र वाल्मिकी सांगतात. त्याला येथे रुग्णालयात आणण्यात आले. माझा शेजारी रवी याने त्याच्या पत्नीचे मंगळसूत्र गहाण ठेवून हॉस्पिटलमध्ये ६,००० रुपये जमा केले होते आणि आता हॉस्पिटलचे अधिकारी माझ्या वडिलांचा मृतदेह सोपवत नाहीत किंवा त्यांनी मला त्यांच्या आजाराची माहिती दिली नाही. दरम्यान, पोलिस स्टेशन प्रभारी मेहताब सिंह यांनी सांगितले की, आम्हाला हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिषेक अग्रवाल यांच्या विरोधात तक्रार अर्ज मिळाला आहे.

## ठाकरे गटाकडून विधानसभेसाठी सर्व जागा लढण्याची तयारी, मात्र ९० जागांवर करणार दावा !

मुंबई, : ठाकरे गटाकडून विधानसभेसाठी २८८ जागा लढण्याची तयारी आहे. मात्र आघाडी असल्याने शिवसेना ९० जागांवर दावा करणार आहे. आम्ही आमच्या जागांचा अभ्यास पूर्ण केला आहे आणि महाविकास आघाडीतील तीनही पक्षांनी आपापल्या जागांचा अभ्यास करून संयुक्त बैठक घेण्याचे ठरवले आहे, असे शिवसेना नेते संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक बीकेसीमधील ट्रायडंट हॉटेलमध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत आगामी निवडणुकीत लढवल्या जाणाऱ्या जागांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीला शिवसेना नेते सुभाष देसाई, खासदार अनिल देसाई, आमदार अनिल परब, सुनील प्रभू, राजन विचारे, शिवसेना आणि युवा सेना सचिव वरुण सरदेसाई आदी नेते उपस्थित होते.शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रितपणे निवडणूक लढवणार असून ९०-९०-९० फॉर्म्युलावर चर्चा सुरू आहे. उर्वरित जागा मित्रपक्षांना सोडण्याचा विचार महाविकास आघाडीतील तीन प्रमुख पक्षांनी केला आहे.उद्धव ठाकरेंनी लोकसभा निवडणुकीत शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षासोबत युती केली होती. विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीसोबत राहून पारंपारिक आणि ताकद असलेल्या जागांवर निवडणूक लढवावी लागणार आहे. मुंबई, कोकण आणि मराठवाडा हे शिवसेनेचे बालेकिल्ले मानले जातात.शिवसेनेची आगामी निवडणूक तयारी जोरदार सुरू असून, महाविकास आघाडीची एकत्रित व्यूहरचना आखण्यासाठी पुढील बैठका होणार असल्याचे संजय राऊत यांनी स्पष्ट केले.

## कोल्हापूरकडे महत्वाची जबाबदारी मराठी भाषेत अभिजात भाषेचा दर्जा समितीच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर मुळे

**कोल्हापूर :** मराठी भाषेत अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी राज्य शासनाने बुधवारी एक समिती गठीत केली आहे. त्याच्या अध्यक्षपदी भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांचे नियुक्ती करण्यात आली आहे.

या निमित्ताने कोल्हापूर जिल्ह्याकडे आणखी एक महत्त्वाची जबाबदारी आली आहे.

याशिवाय राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, भाषा सल्लागार या समितीचे अध्यक्ष व पुण्यातील सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.असा झाला पाठपुरावा

एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून केली जाते. यासाठी केंद्र शासनाने काही निकष विहित केले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ञ संशोधकांची समिती शासनाने २०१२ मध्ये गठीत केली होती. या समितीने सविस्तर विवेचनासह मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी निकषांची पूर्तता करते हे पुराव्यानिशी स्पष्ट केले होते.

त्यानुसार या समितीचा मराठी व इंग्रजी भाषेतील अहवाल २०१३ मध्ये केंद्र शासनाकडे पाठवला होता. त्यानंतरही राज्य शासनाचा केंद्राकडे पाठपुरावा सुरू होता.

समिती काय करणार?

आता तो आणखी गतिमान करण्यासाठी मुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. ही समिती महिन्यातून एकदा दिल्ली येथे केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे संपर्क करून मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी पाठपुरावा करणार आहे.

## काँग्रेसचे दोन बडे नेते शुक्रवारी मुंबईत! विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेऊन रणनीती ठरणार!

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुका अवघ्या तीन महिन्यांवर आल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेस पक्षाला व महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले आहे.

विधानसभा निवडणुकीत असेच यश मिळावून राज्यात काँग्रेस विचाराचे सरकार आणण्यासाठी प्रदेश काँग्रेसने तयारी सुरु केली असून या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल व महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला शुक्रवारी (१९ जुलै) महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. ते मुंबईत बैठका घेऊन निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणार आहेत तसेच काँग्रेस नेते, पदाधिकारी, खासदार आमदारांना मार्गदर्शन करून रणनीती ठरवणार आहेत.




राज्यातील कोणकोणत्या नेत्यांचा बैठकीत असेल समावेश?

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली व के. सी. वेणुगोपाल व प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत सकाळी १० वाजता गरवारे क्लब येथे होणाऱ्या या बैठकीला काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, अविनाश पांडे, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गट नेते आ. सतेज (बंटी) पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव मोघे, नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, प्रणिती शिंदे, कुणाल पाटील यांच्यासह राज्यातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. दुपारी पदाधिकाऱ्यांशी चर्चा, मार्गदर्शन

दुपारी २ वाजता प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी, जिल्हा प्रभारी, खासदार, आमदार, आघाडी संघटनांचे प्रमुख यांची संयुक्त बैठक होणार आहे. या बैठकीत नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे विश्लेषण केले जाणार असून, आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच मतदार याद्या पुनरिक्षणाचा आढावा तसेच संघटनात्मक बाबींचा आढावा घेतला जाणार आहे, व रणनीती ठरवली जाणार आहे. या बैठकीला के. सी. वेणुगोपाल आणि रमेश चेन्नीथला मार्गदर्शन करणार आहेत,

संपादकीय

# आपोआपच जगाची विभागणी

'आमचे येथे श्रीकृपेकरून अमुक अमुक यांचे सुपुत्र आणि अमुक अमुक यांची सुकन्या यांचा शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे. तरी मांडवशोभेसाठी आपण अवश्य यावे' अशी कोणे एके काळची आपल्या वाडवडिलांच्या लग्नाची इतकी थेट पत्रिका धनाजीरावांच्या डोळ्यासमोरून हलत नव्हती. शरीरसंबंध मांडवशोभा छ्या हे म्हणजे फारच झाले. लग्न म्हणजे स्वर्गात बांधल्या जाणाऱ्या पवित्र गाठी, त्या पृथ्वीवर येऊन पक्क्या करायच्या असतात. त्याआधी दोन्ही घराणी किती तोलामोलाची आहेत, हे पाहायचे असते. लग्न म्हणजे दागदागिने, कपडेलत्ते, मेजवान्या, भेटवस्तू, नाचगाणी, भेटीगाठी हेच त्यांना माहीत होते. आपल्या आजोबा-पणजोबांच्या जीवनात जरा म्हणून मनोरंजन नव्हते, म्हणून त्यांनी अशा थेट आणि रूक्ष पत्रिका लिहून लग्ने उरकली. आपण आपल्या धाकट्याच्या बाबतीत मात्र तसे अजिबात करायचे नाही, असे धनाजीरावांनी ठरवून टाकले होते. त्याला कारणही तसेच होते. हे कारण काय आणि हे धनाजीराव कोण म्हणून विचारता? अहो तेच ते. कोणे एके काळच्या आटपाट नगरातले. नाही समजले? पहिल्यापासून नीटच सांगायला हवे आहे म्हणता? चला तर मग काय झाले की पूर्वीच्या कहाण्यामध्ये असते तसे एक आटपाट नगर होते. तिथे धनाजीराव आणि सुंदराबाई हे जोडपे राहत होते. आणि हो, या आटपाट नगरात धनाजीरावांच्या गावीही नसलेले एक नानाजीपंतही होते. पण आपणही त्यांची फार दखल घेण्याची गरज नाही. तर असो, गाठीला बक्कळ पैसा जोडलेल्या धनाजीरावांना गावात चांगलाच मान होता. त्यांचे कुटुंबही खाऊनपिऊन सुखी होते. धनाजीरावांच्या दोन गुणी मुलांचे विवाह झाले होते आणि त्यांच्या कुटुंबात एक सुशील सून आणि जावयाची भर पडली होती. आता त्यांच्या शेंडेफळाचे लग्न होऊ घातले होते. धनाजीरावांच्या घरातले हे शेवटचे कार्य. त्यामुळे सगळ्या पंचक्रोशीत त्याची चर्चा झाली पाहिजे, 'आजवर असा विवाह पाहिला नाही,' असे लोकांनी म्हटले पाहिजे असे धनाजीरावांना वाटत होते. शिवाय त्यांच्या असेही लक्षात आले की त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीच्या, त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत आटपाट नगरात महागाई अगदीच किरकोळ होती. त्यामुळे मग धनाजीराव आणि सुंदराबाई यांनी हा समारंभ झोकात, अगदी हात सैल सोडून करायचे ठरवले.

गावोगावी आमंत्रणे पाठवायची होती. धनाजीरावांचा मित्रपरिवार तसा मोठा आणि वेगवेगळ्या थरांमधला. कुणाला चढवायचे नाही आणि कुणाला उतरवायचे नाही म्हणून ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे पत्रिका छापायचे आणि पाठवायचे ठरले. आपल्या घरातून जाणारी लग्नपत्रिका पुढची पन्नास वर्षे लोकांनी जपून ठेवली पाहिजे, असे धनाजीराव आणि सुंदराबाई यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी पत्रिकाही अशा सोन्याचांदीचा वर्ख ल्यालेल्या छापल्या की त्या ज्यांना ज्यांना मिळाल्या त्या बघून सगळ्यांनी आ वासला. ज्यांना पत्रिका गेल्या नाहीत, त्यांना म्हणजे नानाजीपंतांना आपोआपच समजले की आपण किती मोठे व्हायला हवे, तर धनाजीरावांच्या घरून आमंत्रण यायला हवे एवढे. त्यामुळे ज्यांना धनाजीरावांकडून पत्रिका आली असे लोक आणि ज्यांना आली नाही असे लोक अशी आपोआपच जगाची विभागणी झाली. तर असो. लग्न समारंभ एकाच दिवशी झाला तर तो कशाला कुणाच्या लक्षात राहील, असे धनाजीरावांना वाटत होते. लग्न मुहूर्तावर लावायचे असल्यामुळे ते एकदाच लावावे लागते, पण साखरपुड्याचे तसे काही नसते अशी पळवाट गुरुजींनी काढून दिल्यावर सगळे कसे सोपे होऊन गेले. एकदा मुलाच्या घरी, एकदा मुलीच्या घरी, एकदा शेतातल्या बंगल्यावर असा तीन तीन वेळा साखरपुडा झाला. अशीच वेगवेगळ्या ठिकाणी तीन तीन वेळा व्याहीभोजने झाली. त्याशिवाय संगीत समारंभ, मेंदी समारंभ, सीमान्तपूजन आणि मुख्य लग्न समारंभ आणि त्यानंतरचा स्वागत समारंभ अबब या सगळ्या कार्यक्रमांमधल्या वधूवरांच्याच नाही, तर इतरांच्याही पोशाखांची, दागदागिन्यांची, जेवणावळींमधल्या पदार्थांची यादी ऐकूनच नानाजीपंतांची दमछाक होत होती. तीन साखरपुडे, तीन व्याहीभोजने आणि प्रत्यक्ष लग्न समारंभ यांत वेगवेगळे पेहराव करायचे, त्यावर वेगवेगळे दागिने घालायचे म्हणजे वऱ्हाडी मंडळींनीच धनाजीरावांच्या चिरंजीवांच्या विवाहासाठी किती बरे खर्च केला असेल, अशी चर्चा नानाजीपंतांच्या घरीदारी रंगू लागली.नानाजीपंतांना वाटू लागले,

# पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप..! रॉयल ब्रदर्स फाउंडेशन विरार (रजि.)संस्थेचा स्तुत्य उपक्रम..!

आबलोली
(संदेश कदम)

रॉयल ब्रदर्स फाउंडेशन विरार (रजि.)ही एक सामाजिक संस्था असून यावर्षी या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विभागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पालघर जिल्ह्यातील पारोल विभाग आणि विरार विभागातील चार जिल्हा परिषद शाळांमधील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. रॉयल ब्रदर्स फाउंडेशन विरार(रजि.) या संस्थेच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत असून या कार्यक्रमाला उपस्थित संस्थापक अमित पवार आणि दर्शन कदम, खजिनदार अविनाश सावंत, संस्था सदस्य कृष्णा आडके, तुषार शेळके, नितेश बरफ आणि ग्रामीण विभाग सदस्य दीपचंद्र कुवरा आणि कल्पेश सातवी,प्रकाश यांच्या उपस्थितीत शैक्षणिक साहित्य वाटपाचा सोहळा पार पडला.

परिवर्तन फाउंडेशन संस्थापक कुलदीप दादा चौधरी आणि देणगीदारांनी शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमात मोलाचा आर्थिक हातभार लावलां उपसचिव तुषार गिरकर

संस्था सदस्य कृष्णा आडके,



प्रशांत कदम, राकेश पवार ,योगेश बारे तसेच सढळ हस्ते मदत करणारे देणगीदार समाज सेवक श्री.अविनाश पवार दादा, समाज सेवक श्री.अनिल वडे सर ,

पारस सवतिरकर, अविनाश पालेकर, गंगा आडके, संजना ब.आडके ,श्री. प्रमोद शितप ,कु.मयूर नारकर ,श्री. विलास कासारे ,

सौ.रुतिका शेळके,प्रणाली सप्रे,

सुषमा गर्दे. प्रविण खराडे,शंकर सावंत,साहिल लंघा,महादेव पिलके,दिनेश पाटिल,उमेश खिलारे,सूर्यकांत गोळे,प्रकाश लटके,प्रियांश सत्रा,नरेंद्र साळवी,

लवजीभाई जीवनभाई पटेल,

संतोष धनवी,कै.श्री.दादाजी बाबाजी गावकर,प्रितम बोंद्रे,अक्षय गवाने,प्रसाद पवार,

अमोल शिंदे,आनंद शिंदे,

प्रशांत पवार,राजू चौहान

सचिन कोकरे,रमेश पाटिल,

विनायक पवार,शशिकांत जोतिबा भदरगे,हेमंत दमने,सिद्धेश राऊत, ओमकार डोंगरकर,आकाश नाग, संजय तोंडवलकर,महेश चव्हाण, यश रेवाडेकर,प्रदीप शंकर शेलार,

रुपेश शेट्टे,शबाना खान,

पॉल फर्नांडिस,रेणुका खाडे, देबाशिष महोपात्रा,सूरज साटम,

रवींद्र गावडे,संजना कुळयें,प्रतीक सावंत,प्रकाश कांबळे,अनिकेत येरम,अमित गायकवाड, नागेश नेलमकर,सिद्धेश पोरे , सिद्धेश गोरे , मनाली छेत्रे , प्रियांका वाघमारे अहिल्या यादव,

रोहन खोत,शिवम यादव,चंदा तिवारी,शाहनवाज खान,नीमेश वराडकर,प्रदीप वर्मा, किमया हर्षाली, राहुल कदम,माधव शिंदे,

शिवम उपाध्याय, रुपेश बाईत,

अरविंद बेर्डे,प्रशांत संके,संजय खेडेकर,सुमित डोंगरे,राजेश कुवल, आयुष सिंग, परमेश्वर माळी, गौरव खानविलकर, सिद्धी सांडे, विलास कदम ,दीपक पाटील महेश, अरविंद उमसारे ,माऊली वेल्थ सर्विस, प्रथमेश शेमनकर, अनिल पांडे, आई जीवदानी संयुक्त प्रसादिक भजन मंडळ, निखिल मिश्रा, अमित सिंग सर उमेश , उदेक, तुषार चौधरी, प्रवीण सालियन, आनंद शेलार अजय मिसळ, बाळासाहेब कुरळे या सदस्यांनी सढळ हस्ते मदत केली त्यांचे आभार मानण्यात आले.देणगीदार सदस्यांच्या सहकार्यामुळेच पालघर जिल्ह्यातील पारोल विभाग आणि विरार विभागातल्या चार जिल्हा परिषद शाळांना शैक्षणिक साहित्य वाटपा चा कार्यक्रम नुकताच रॉयल ब्रदर्स फाउंडेशन (रजि ) या संस्थेकडून उत्साहात संपन्न झाला. यापुढेही असेच सहकार्य पुन्हा घडत राहो आणि आपल्या सर्वांच्या हातून गरीब ,गरजू मुलांना मदत होत राहो हीच अशी मनोकामना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली

# राज्यस्तरीय स्वच्छता मॉनिटर टप्पा दोन मध्ये जि.प. कुडली नं.४ शाळेची उत्कृष्ठ कामगिरी ..!

आबलोली
(संदेश कदम)

राज्यस्तरीय लेट्स चेंज प्रकल्प फेस दोन स्वच्छता मॉनिटर टप्पा २ अंतर्गत राज्यातील टॉप १०० शाळांची स्वच्छता मॉनिटरगिरी मध्ये निवड करण्यात आली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातून गुहागर तालुक्यातून जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कुडली नंबर ४ या शाळेचा यामध्ये समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य कचऱ्याबाबत निष्काळजी मुक्त करण्यासाठी स्वच्छता मॉनिटर हा उपक्रम शिक्षण मंत्री श्री .दीपक केसरकर यांनी पुढाकार घेतल्यानंतर प्रकल्प संचालक रोहित आर्या व्यवस्थापक सागर याळवार, रत्नागिरी शिक्षण विस्तार अधिकारी




मंजुषा पाध्ये यांच्या मार्गदर्शनातून स्वच्छता मॉनिटर फेस १ यशस्वीपणे राबविल्यानंतर संपूर्ण राज्यात स्वच्छता मॉनिटर टप्पा २ पार पडला. स्वच्छता मॉनिटर टप्पा १ मध्ये सुद्धा जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कुडली नंबर ४ या शाळेचा रत्नागिरी जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला होता यामध्ये स्वच्छता मॉनिटर टप्पा एक मधील स्वच्छता मॉनिटरगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार मुंबई येथे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते करण्यात आला. पहिल्या टप्प्याच्या यशस्वीते नंतर कुडली नंबर ४ शाळेने टप्पा २ मध्ये सुद्धा स्वच्छता मॉनिटरगिरी उत्कृष्ठपणे करून दाखविली आहे.शाळेतील विद्यार्थी १) आयुष अविनाश जाधव २) सिद्धांत अविनाश जाधव ३) निशा नंदकुमार जाधव ४) आराध्या प्रबोध जाधव ५) अल्पिता विभास जाधव ६) दिव्या दीपक कांबळे ७) अर्पण भरत जाधव ८) प्रणव अविनाश जाधव ९)अवनी अनिल जाधव १०) सार्थक जितेंद्र जाधव ११) स्वागता कृष्णा वणे १२) आरोही प्रबोध जाधव १३)आर्यन महेंद्र जाधव १४) अदिती राजेंद्र जाधव १५) श्रावस्ती जितेंद्र जाधव १६) अस्मि प्रबोध जाधव १७) तन्वी विनायक जाधव या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट मॉनिटरगिरी केली. यासाठी त्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका माधवी पाटील, शिक्षक अजित पाटील, विराज सुर्वे यांनी मार्गदर्शन केले.या यशाबद्दल गुहागर तालुका गटशिक्षणाधिकारी लीना भागवत, जिल्हा समन्वयक मंजुषा पाध्ये,विस्तार अधिकारी तब्बसूम काझी,केंद्र प्रमुख परवेज चिपळूणकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रेखा जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष अनिल जाधव, भरत जाधव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तालुका गुहागर पक्षाचे श्री आनंद जाधव यांचेसह ग्रामस्थ, पालक आदि.मान्यवरांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# आयु. रघुनाथ विठ्ठल वाघमारे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्ताने,आदिवासी आश्रम शाळा - चिवे येथील ३५० मुलांना शैक्षणिक मदतीचा हात

पाली/बेणसे-
(धम्मशील सावंत)

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील अतिशय दुर्गम गावचे मौजे हातोंड चे सुपुत्र आयु. रघुनाथ विठ्ठल वाघमारे यांचा ७५ वा वाढदिवसाचे औचित्य साधून वाघमारे कुटुंबीयांनी आदिवाशी आश्रम शाळेतील सुमारे साडेतीनशे मुलांना शैक्षणिक साहित्य देवून खाऊ वाटप केले. सामाजिक बांधिलकी आणि सेवारून जपत साजरा केलेला वाढदिवस सर्वांना प्रेरणा देणारा ठरतोय.




आयु. र. वि. वाघमारे गुरुजी यांची सुरुवातीची नोकरी यांच आश्रम शाळेत झाली होती. इथे ते मुक्कामी राहत असत. त्यांचा मोठा मुलगा राजेंद्र यांचा जन्म देखील इथलाच आहे. आयुष्याची भाकरी त्यांना खऱ्या अर्थाने इथूनचं भेटली. ते ऋणानुबंध मनाशी कायम ठेवून , आपल्या पत्नी समवेत मुलं ,मुली ,सुना ,जावई ,नातवंडे सह या आश्रम शाळेस भेट दिली. त्याकाळी राहात असलेली खोली अजूनही जशीच्या तशी आहे. फक्त छत बदलले आहे आणि पोटमाळा काढला आहे व जमिनी ऐवजी टाइल्स बसवल्या आहेत. ही खोली सर्व मुलांनी नातवंडांनी आवर्जून पाहिली आणि इतिहास जतन करून डोळ्यात साठवून ठेवला.

शाळेतील शिक्षिका व विद्यार्थीनिनी ओवाळूण औक्षण केले. सुंदर असे स्वागत गीत गाऊन वातावरण आनंदीमय केला. आयु. महाबळे सरांनी सुंदर सूत्रसंचालन केले ,आयुनि. पिंगळे मॅडम यांनी मार्गदर्शन करून प्रेरीत केले. आयु. गुरव सरांनी प्रमुख अतिथिचा त्यांना परिचित असणारा इतिहास कथित केला. दरम्यान आयु. र. वि. वाघमारे ( गुरुजी ) , त्यांचा मुलगा सिद्धार्थ व राजेंद्र यांनी मुलांना मार्गदर्शन केले. प्रो. मिनाक्षी विकास म्हस्के - वाघमारे यांनी सुंदर गोष्ट सांगितली.

यावेळी वाघमारे कुटुंबातून आयुनि .सुनंदा रघुनाथ वाघमारे (पत्नी ) आयु. राजेंद्र -सिद्धार्थ - राहुल (मुलं ), आयुनि. अर्चना - रागिणी - सोनल (सुना ) , आयुनि. संध्या - मिनाक्षी (मुली ) , आयु. मिलिंद कासारे , आयु. विकास म्हस्के (जावई ) ,स्नेहल , दिक्षा ,दिक्षा कासारे , ईशीता , अपर्णा , कुणाल आणि शौर्य ( नातवंडे ) यांची उपस्थिती अभ्यासू दर्शक इतिहासाच्या पाऊल खुणा जोपासणारी राहिली.

आश्रम शाळेतील आयु. जे. एम. गुरव सर (प्रा. मुख्याध्यापक ) , आयुनि. एस. व्ही. पिंगळे मॅडम (मा. मुख्याध्यापिका ) , आयुनि. एस. एल. चव्हाण मॅडम (प्रा. शिक्षिका ), आयुनि. आर. डी. काळे मॅडम (मा. शिक्षिका ) , आयु. के. आर. महाबले सर ( प्रा. शिक्षक ), आयु. आर. आर. खोपडे सर (प्रा. शिक्षक ), आयुनि. ए. आर. चाटे मॅडम (प्रा. शिक्षिका ), आयुनि. कु. जे. वारगुडे मॅडम (मा. शिक्षिका ), आयुनि . आर. आर. रुईकर मॅडम ( प्रयोगशाळा परिचर ), आयु. जी. जे. आंबोरे सर ( वसतीगृह अधीक्षक ), आयुनि. एच. एस. वळवी मॅडम (वसतिगृह अधिक्षीका ), आयु. एस. डी. परबलकर (शिपाई ), आयुनि. डी. डी. जगताप (कामाठी ), आयु एम. आर. सानप (स्वयंपाकी ), आयु. एस. एस. कांबळे (स्वयंपाकी ), आयु. ए. एच. बावधने (स्वयंपाकी ),आयु. एम. डी. शिर्के (स्वयंपाकी ) आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यास मौलिक सहकार्य केले.

# पालीमध्ये समन्वय समितीची बैठक ! सुधागड तालुका समन्वय समितीच्या बैठकीत अंबा नदी प्रदूषण, अनधिकृत बांधकामे, जलजीवन मिशनच्या कामांकडे वेधले लक्ष

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/ मंगेश यादव

सुधागड तालुका समन्वय समितीची बैठक सोमवारी (१५ जुलै) तहसील कार्यालयातील हिरकणी कक्षेत पार पडली. या बैठकीत अक्षरशः तक्रारींचा पाउस पडला. अंबा नदी प्रदूषण, कंपन्यांमधील अनधिकृत बांधकामे, जलजीवनश मिशन योजनांची कामे अशा अनेक महत्वाच्या विषयांकडे यावेळी लक्ष वेधण्यात आले.ङ्गसुधागड तालुक्यातील रासळ ग्रामपंचायत हद्दीतील काही केमिकल कंपन्यामधील रसायनयुक्त सांडपाणी कंपनीच्या मागील बाजूस असणाऱ्या अंबा नदीत सोडले जाते. तसेच येथील काही कंपन्यांमध्ये परवानगी न घेता अनधिकृत बांधकामे केली जात असल्याचे आरोप रासळ ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नरेश खाडे यांनी समन्वय समितीच्या बैठकीत केला. यावर समन्वय समितीचे अध्यक्ष अनुपम कुलकर्णी यांनी सांगितले की, हा विषय अतिशय गंभीर असून तहसीलदार यांनी याकडे तात्काळ लक्ष देऊन वरिष्ठ पातळीवर निर्णय घेऊन संबंधित विभागाकडून कंपन्यांना नोटीस देण्यात याव्यात.ङ्गसुधागड तालुक्यात होत असणाऱ्या जल जीवन मिशनच्या कामाकडे समन्वय समितीचे सदस्य अरविंद फणसे यांनी लक्ष वेधले. काही ठिकाणच्या विहिरींना पाणीच लागलेले नाही, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मात्र संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी याचा इन्कार केला. यावर अध्यक्षांनी सदर कामाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात येईल, असे सांगितले. लाडकी बहीण योजनेचा तालुक्यातील महिलांना फायदा मिळवून देण्यासाठी कॅम्प घेऊन त्यांना दाखल्याची व्यवस्था करावी अशी मागणी यावेळी अध्यक्ष कुलकर्णी यांनी तहसीलदारांकडे केली. समन्वय समितीच्या बैठकीस काही शासकीय अधिकाऱ्यांनी दांडी मारली. बामुळे महिला सक्षमीकरण आणि सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार निर्मितीच्या विविध शासन योजना आणि उपक्रम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात अधिकारी सपशेल अपयशी ठरले असल्याची खंत सुधागड तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष अनुपम कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळावी, सर्वसामान्य जनतेचे विविध प्रश्न समस्यांचे निवारण व्हावे, याकरिता सामान्य जनता आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधून प्रशासनावर पकड ठेवून शासन योजनेची अंमलबजावणी व्हावी, यासाठी समन्वय समिती कार्यरत असल्याचे अनुपम कुलकर्णी यांनी यावेळी म्हटले.

यावेळी अकार्यक्षम आणि कामचुकार शासकीय अधिकाऱ्यांना पारेवर घरत जनहिताच्या कामाला प्रथम प्राधान्य द्या, असे आवाहन सरकारी अधिकाऱ्यांना यावेळी करण्यात आले. या बैठकीला तहसीलदार उत्तम कुंभार, नायव तहसीलदार भारत फुलपगारे, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे, समन्वय समितीचे सदस्य संजय म्हात्रे, संदीप दपके, अमोल कांबळे, अरविंद फणसे, गणेश शिंदे आदींसह सदस्य विविध शासकीय विभागाचे अधिकारी व पत्रकार उपस्थित होते. बँकांचे अधिकारी बैठकीला गैरहजर असल्याने सुधागड तालुक्यातील जनतेला बँकेशी निगडित कशा पद्धतीची सेवा मिळत असतील ? त्यांच्या तक्रारीचे काय? याबाबत नाराजी व्यक्त करीत विचारणा करण्यात आली.ङ्ग गैरहजर राहिलेल्या अधिकाऱ्यांची तक्रार जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे करण्याबाबत समन्वय समिती अध्यक्ष अनुपम कुलकर्णी यांनी सुचविले.





**आदरणीय कोकण भूषण श्री. राजाभाऊ शेंबेकर यांना नुकताच बालगंधर्व रंग सेवा पुरस्कार पुणे येथे प्रदान करण्यात आला. त्याबद्दल श्री. राजाभाऊंचे हार्दिक अभिनंदन व सत्कार करताना रत्नागिरी पुरोगामी परिवाराचे जिल्हा पदाधिकारी ... भक्तिमय गान सेवेला हार्दिक शुभेच्छा.**

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण : २ लाख २० हजार ७७ अर्ज दाखल ; ७४.९४ टक्के उद्दिष्ट पूर्ण

रत्नागिरी, दि. १८ (जिमाका) : जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत ऑनलाईन ५७ हजार २६९ तर ऑफलाईन पध्दतीने १ लाख ६२ हजार ८०८ अर्ज असे एकूण २ लाख २० हजार ७७ महिलांनी अर्ज दाखल केलेले आहे. जिल्ह्याला एकूण असलेल्या उद्दिष्टापैकी ७४.९४ टक्के इतके उद्दिष्ट पूर्ण केले आहे.

जिल्ह्यात राजापूर तालुक्याने उत्तम कामगिरी केली असून २९९३७ उद्दिष्टांपैकी अर्ज २८९०४ प्राप्त झाले असून, प्रमाण ९६.५५ टक्के आहे.ङ्ग महिलांना सक्षम करण्यासाठी, महिला भगिनी घरातील आर्थिक नियोजन करत असताना त्या आर्थिक नियोजनामध्ये सरकारचा देखील सहभाग असावा, यासाठी देशातील पहिला ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या योजनेची अंमलबजावणी जिल्ह्यात जोरात सुरु आहे. तालुकानिहाय उद्दिष्ट, प्राप्त अर्ज संख्या आणि टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

मंडणगड ८२६६ उद्दिष्टांपैकी अर्ज ६६१४ प्राप्त झाले असून,

प्रमाण ८०.०१ टक्के, दापोली ३६५४७ उद्दिष्ट पैकी अर्ज २५९५४ प्राप्त झाले असून प्रमाण ७१.०२ टक्के, खेड ३५५०५ उद्दिष्ट पैकी अर्ज १८४७२ प्राप्त झाले असून प्रमाण ५२.०३ टक्के, चिपळूण ३४३२३ उद्दिष्ट पैकी अर्ज २९७१९ प्राप्त झाले असून प्रमाण ८६.५९ टक्के, गुहागर तालुक्यात २९७६६ उद्दिष्ट पैकी अर्ज १७६०६ प्राप्त झाले असून प्रमाण ५९.१५ टक्के, संगमेश्वर ३८७१६ उद्दिष्ट पैकी अर्ज २७४०२ प्राप्त झाले असून प्रमाण ७०.७८ टक्के, रत्नागिरी ६१२५१ उद्दिष्ट पैकी अर्ज ४८७७२ प्राप्त झाले असून प्रमाण ७९.६३ टक्के, लांजा तालुक्याला १९३६५ उद्दिष्ट पैकी अर्ज १६६३४ प्राप्त झाले असून प्रमाण ८५.९० टक्के, राजापूर तालुक्यात २९९३७ उद्दिष्ट पैकी अर्ज २८९०४ प्राप्त झाले असून प्रमाण ९६.५५ टक्के आहे.

# जि. प.शाळा आवरे शाळेत रॉयल इलेव्हन क्रिकेट संघातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप..!

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील आवारे गावातील रॉयल इलेव्हन क्रिकेट संघ आवरे या क्रिकेट संघातर्फे गावातील अंगणवाडी ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इयत्ता प्रमाणे शैक्षणिक साहित्याचे नुकतेच



वाटप करण्यात आले हा कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवरे येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ तसेच शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य ,पालकवर्ग उपस्थित होते. यावेळी रॉयल इलेव्हन क्रिकेट संघा विषयी श्री.संदीप भरणकर यांनी माहिती दिली की ,रॉयल इलेव्हन क्रिकेट संघातर्फे अनेक आजारी व्यक्ती ,गरजू व्यक्तींना मदत केली जाते. शाळेतील विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. रामचंद्र गुरव व श्री. सखाराम गुरव,श्री. सुरेश गोताड, श्री.सुनील भरणकर श्री .यशवंत शितप (शिक्षणतज्ञ),सौ.सुचिता भरणकर (शा. व्य.समिती अध्यक्ष),

सौ.शालिनी शितप (ग्राम.समिती सदस्य),सौ. कृतीका खळे(माता पालक संघ अध्यक्ष), श्रीम.वंदना जाधव याच्या शुभ हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमासाठी सौ.अपर्णा जाधव मॅडम(अंगणवाडी सेविका),सौ.धनश्री गोताड. (मदतनीस ), रॉयल इलेव्हन संघातील श्री.निलेश घुमे,श्री विशाल गोताड ,श्री.मंगेश भरणकर, श्री.संदीप भरणकर उपस्थित होते. शैक्षणिक साहित्य वाटप केल्याबद्दल जिल्हा परिषद शाळा आवरे कडून रॉयल इलेव्हन क्रिकेट संघाला आभारपत्र देण्यात आले. सदर पत्र,कार्यक्रमाचे अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.संध्या दिनेश नेटके,उपशिक्षिका सौ.संस्कृती वैभव ढवळ यांच्या हस्ते देण्यात आले व सर्वांचे आभार मानण्यात आले.

# ‘दुनिया मुठ्ठी मे’

शैक्षणिक व्यवस्थेचे मातेरे करून, अभियांत्रिकी, वैद्याकीय शाखांचा खेळखंडोबा करून आता आपण केंद्रीय लोकसेवा परीक्षांमध्ये दिवे लावायला सुरुवात केली आहे.

स्पर्धा परीक्षांवर सर्व लक्ष केंद्रित करणारे या देशातील बुद्धिमान, कष्टकरी इत्यादी इत्यादी विद्यार्थी आणि त्यांच्या यशाच्या स्वप्नरंजनात मशगूल पालक या उभयतांनी पूजा खेडकर यांचे शतश: आभार मानायला हवेत. यश मिळविण्यासाठी अभेद्या, दुष्प्राप्य वगैरे समजल्या जाणाऱ्या या परीक्षांच्या आणि नंतरच्या अधिकारी निवड प्रक्रियेचा बुरखा या पूजाबाईंनी टराटरा फाडला असून त्यांच्या या एकहाती कर्तबगारीची नोंद देशाच्या प्रशासकीय इतिहासात सुवर्णाक्षरांत केली जाईल, यात तिळमात्रही शंका नाही. एखादी व्यक्ती व्यवस्था, नीती-नियम आदींस खुंटीवर टांगून पोलादी परीक्षा यंत्रणेचा लौकिक कसा मातीमोल करू शकते आणि असे करून मजबूत मानली जाणारी यंत्रणा किती कचकड्याची आहे हे दाखवून देऊ शकते याचे या पूजाबाईइतके उत्तम उदाहरण शोधूनही सापडणार नाही. अर्थात त्यांच्या या अभूतपूर्व यशामागे बुद्धिमान, प्रामाणिक कष्ट केल्याशिवाय यश मिळत नाही अशी वदंता असणाऱ्या परीक्षांचे पार मातेरे करण्यात समाज म्हणून आपल्या निष्क्रिय सहभागाचा वाटा आहे हे नाकारता येणार नाही, हे खरे. अलीकडेच आपण वैद्याकीय अभ्यासक्रमासाठी अत्यंत चुरशीच्या मानल्या जाणाऱ्या ‘नीट’ परीक्षांचे उत्तम वाटोळे केले. ते पूर्ण व्हायच्या आत या पूजाबाईच्या सौजन्यामुळे स्पर्धा परीक्षांचा क्रम लागला. आयएएस, आयपीएस, आयएफएस इत्यादी परीक्षांत यशस्वी होणे या देशातल्या प्रत्येक तरुण-तरुणीचे स्वप्न असते आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी शिक्षणाच्या बाजारपेठा दुथडी भरून वाहत असतात. या परीक्षांत यशस्वी होण्यासाठी किती कष्ट करावे लागतात, दिवसाचे २०-२० तास अभ्यास करावा लागतो, मुलाखतीचे तंत्र आत्मसात करावे लागते, सामान्यज्ञान उत्तम असावे लागते, चतुरस्रा व्यक्तिमत्त्व विकासाचा ध्यास असावा लागतो इत्यादी इत्यादी कथाकहाण्यांनी घरोघरीचे शैक्षणिक वातावरण भारलेले असते. तथापि या परीक्षा, त्यांची निवड पद्धती प्रत्यक्षात कोणत्याही ग्रामसिंह शिक्षणसम्राटाच्या संस्थेतील प्रवेश प्रक्रियेप्रमाणे ‘मॅनेज’ करता येऊ शकते किंवा काय असा प्रश्न या पूजनीय पूजाबाईची कृती दर्शवते. त्यांच्या या कर्तृत्वासाठी स्पर्धा परीक्षांसाठी रक्त आटवणाऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या त्यांच्या ऋणात राहतील.याचे कारण इतके दिवस प्रशासकीय अधिकाऱ्यांची प्रशिक्षण अकादमी ही फक्त उच्च दर्जाची वधू-वर संस्था आहे असे मानले जात होते. देशातील अनेक पॉवरफुल अधिकाऱ्यांच्या पॉवरफुल जोड्यांच्या गाठी स्वर्गात नव्हे तर मसुरीच्या या प्रशिक्षण अकादमीत बांधल्या जातात, हे अनेक जण जाणून होते. त्यामुळे पती कलेक्टर तर पत्नी सीईओ, हा गृहसचिव तर ती महसूल खात्यात, ती आयकर खात्यात तर तो अबकारीत इत्यादी अनेक सरकारी मेहुण हा देश पाहात आलेला आहे. आपल्या सुविद्या श्वानाच्या फेरफटक्यात व्यत्यय नको म्हणून आयएएस अधिकारी जोडपे स्टेडियमवर खेळाडूंनाच प्रवेशबंदी कशी करू शकते हे आपण पाहिलेले आहे. आपल्या (अर्थातच प्रिय) पत्नीच्या प्रभात आणि सायंकालीन फेरफटक्यात अन्य कोणाची बाधा नको म्हणून पटांगणावर सामान्यांसाठी निर्बंध आणणारा कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी महाराष्ट्रानेही याचि देही बघितलेला आहे. सेवाकाळात संधान बांधून निवृत्त झाल्या झाल्या उद्याोग समूहास ‘दुनिया मुठ्ठी मे’ घेण्यात कायावाचामनोभावे साथ देणारे आयएएस अधिकारी तर डझनांनी सापडतील. निवृत्त झाल्या झाल्या राजकीय पक्षांत सहभागी होऊन थेट निवडणुकांच्या राजकारणात उतरणारे, निवृत्योत्तर पदांची बेगमी सेवाकाळात करणारे वगैरे तर किती दाखवावेत!

सत्ताधाऱ्यांच्या वळचणीस राहून त्यांच्यावर होणाऱ्या सत्तासंपत्ती वर्षावाचे चार तुषार आपल्याही अंगावर कसे उडतील याची खबरदारी घेणारे इत्यादींची तर गणतीच नाही. पण एक प्रशिक्षणार्थी पूजा निपजते आणि या सर्वांपेक्षा आपण किती सरस हे दाखवून देते ही बाब कौतुकास्पदच! आधीच्या पिढीचे कर्तृत्व पुढची पिढी आणखी पुढे नेते ते असे. यावरून काही मुद्दे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होतात.

जसे की आपल्या शैक्षणिक व्यवस्थेचे झाले आहे तितक्या मातेऱ्यावर आपण समाधानी नाही. पहिली ते दहावी, बीए, बीएस्सी, बीकॉम वगैरे पदवीधारी पण प्रत्यक्षात अक्षरओळखी बुद्धिमत्तेच्या पिढ्यानपिढ्या प्रसवल्यानंतर आपण आपल्या अभियांत्रिकीचा खेळखंडोबा केला. टुकार दर्जाचे इतके अभियंते आपण निर्माण केले की त्यांच्या कौशल्यापेक्षा ‘आयटीआय’ प्रमाणपत्रधारी अधिक उपयुक्त आणि गुणवंत ठरू लागले. अशा तऱ्हेने अभियांत्रिकीचे दिवाळे निघाल्याची खात्री झाल्यावर आता क्रम वैद्याकीय शाखेसाठी आवश्यक ‘नीट’ परीक्षांचा. याबाबतही तसा महाराष्ट्र आघाडीवर. ऐन निवडणुकांच्या तोंडावर राजकीय सोयीसाठी नवे आरक्षण धोरण आणून काही वैद्याकीय शाखांत खुल्या प्रवर्गात एकही प्रवेश मिळू न देण्याची व्यवस्था महाराष्ट्राने २०१९ सालीच करून दाखवली. त्यानंतर पावित्र्य राखून होत्या दोनच विद्याशाखा. ‘आयआयटी’चे अभ्यासक्रम आणि केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या आयएएस वगैरेसाठींच्या परीक्षा. त्याच्याआधीच्या राज्य लोकसेवा आयोग परीक्षांची माती आपण यशस्वीपणे केलेली आहेच. यातही महाराष्ट्राचा दबदबा मोठा. परीक्षांपाठोपाठ परीक्षांचे पेपर कसे फोडता येतात, हे या राज्याने दाखवून दिले. असे होत असताना केंद्रीय लोकसेवा परीक्षांचा लौकिक तसा टिकून होता. या परीक्षांतील यशस्वी सेवेत आले की उत्तरायुष्यात किती तेजस्वी दिवे लावतात हे सर्वांस ठाऊक होतेच. पण ही ‘दिवेलागण’ परीक्षांपासूनच सुरू करता येऊ शकते हे दाखवून देण्याचे श्रेय मात्र या पूजाबाईचे. कोट्यधीश पालक असतानाही त्यांचे उत्पन्न त्यांच्या या ‘सुकन्ये’च्या निवडीच्या आड येऊ शकत नाही, बहुविकलांगत्वाचा दावा केलेल्या व्यक्तीचे वैद्याकीय प्रमाणपत्र तपासायला हवे असे निवडणाऱ्यांस वाटत नाही

# अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन व लायन्स क्लब डायमंड अलिबागचे वृक्षारोपण : फोफेरी- चिंचवली येथे केली ५०० झाडाची लागवड

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:-

अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन लायन्स क्लब डायमंड अलिबाग, वन विभाग अलिबाग यांच्या वतीने खारेपाठ विभागतील फोफेरी चिंचवली येथे वन विभागाच्या जागेवरती ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन लायन्स क्लब डायमंड अलिबाग वन विभाग अलिबाग यांच्या वतीने चिंचवली डोंगर परिसरातील वन विभागाच्या मोकळ्या जागे मध्ये भारतीय वशांची आंबा,कदंब, उंबर, काजू, वड, पिंपळ, आवळा, करंज, बांबू यासारखी कमी पाण्यावर जगणारी ५०० झाडे लावण्यात आली. या वेळी अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन च्या अध्यक्षा डॉ. सुनिता पाटील,लायन्स क्लब च्या अंकिता पाटील, डॉ.रेखा म्हात्रे, डॉ. रवींद्र म्हात्रे डॉ. मकरंद पाटील, डॉ प्रशांत बाईकर डॉ. आदेश मोकल,डॉ.हरीष भगत डॉ. मनोज पाटील, डॉ. राजाराम पाटील, डॉ. स्वप्निल पाटील व इतर सदस्य व ग्रामस्थ सहभागी झाले होते.



दरवर्षी असह्य होत जाणारे तापमान,वाढत जाणारे प्रदूषण आणी त्याच वेगाने होणारी वृक्षतोड या सर्वांवर खूप वर्षे तग धरणारी वृक्ष लागवड आणी त्याचे संवर्धन हा एक प्रभावी आणी शाश्वत मार्ग आहे.या बाबी लक्षात घेऊन दीर्घ आयुष्य जगणारी व मोठी वाढणारी आणि जास्त ऑक्सिजन देणारी अशीच झाडे लावली गेली असल्याचे यावेळी सांगण्यात आले . या झाडाचे संगोपन करण्याचा निर्धार ही करण्यात आला आहे.

सदर उपक्रमाला सामाजिक वनिकरण विभाग-अलिबाग व फोफेरी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ यांचीही विशेष मदत झाली.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
सूर्योदय
शुक्रवार १९ जुलै २०२४ 

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# कर्जतमध्ये प्रती पंढरपूर आळंदी येथे अनेक विठ्ठल भक्तांनी घेतले दर्शन ! आमदार महेंद्र शेठ थोरवे यांनी दिल्या सर्वांना शुभेच्छा

कर्जत ( जयेश जाधव) कर्जत शहरात उल्हास नदीच्या तीरावर कार्यसम्राट आमदार महेंद्र शेठ थोरवे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या '' प्रती पंढरपूर आळंदी '' उभारून या परिसरात ५२ फुटी '' श्री विठ्ठलाची '' मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असून या ठिकाणी आज देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने हजारो श्री विठ्ठल भक्तांनी , महिला भगिनी , आबालवृद्ध , बच्चे कंपनीने दर्शन घेतले . यानिमित्ताने आमदार महेंद्र शेठ थोरवे फाउंडेशनच्या वतीने भक्ती संगीत व नृत्याचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

आज बुधवार दिनांक १७ जुलै २०२४ रोजी देवशयनी आषाढी एकादशी निम्मित सकाळी १० ते १२ भक्ती भजन कार्यक्रम कर्जत शिक्षण प्रसारक महिला भजनी मंडळ गायिका सौ सुचिताताई वांजळे (स्व.गजाननबुवा पाटील यांचा कन्या) हार्मोनियम श्री मधुकर भोईर , तबला श्री रमेश खरमरे , संध्याकाळी ४ ते ६ भजन भूषण कै . गजानन बुवा पाटील यांचे पट्टशिष्य श्री दिपकबुवा करोडे (कर्जत) यांचे सुश्राव्य भजन पखवाज श्री आकाश काटे , तर सायं . ६ ते रात्री ८ गायिका निकिता ठोंबरे वादक ओंकार कराळे , पखवाज हर्षद ठोंबरे असे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

यावेळी आमदार महेंद्र शेठ थोरवे यांनी उपस्थित राहून श्री विठ्ठलाचे पुष्प वाहून दर्शन घेतले . माझ्या तमाम कर्जतकरांना व ज्या विठ्ठल भक्तांना पंढरपूर येथे जाऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेता येत नाही अशा भाविकांसाठी हे प्रती पंढरपूर आळंदी वसविण्यात आल्याचे सांगून सर्व श्री विठ्ठल भक्तांना देवशयनी आषाढी एकादशीच्या त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या . यावेळी प्रसाद म्हणून सर्वांना आमदार महेंद्र शेठ थोरवे फाउंडेशनच्या वतीने फराळ वाटप करण्यात आला.





## आषाढी एकादशी निमित्त खेड तालुका वारकरी सांप्रदाय मंडळ भरणे यांसाठी इन्फिगोतर्फे मोफत नेत्र तपासणी शिबीर

प्रतिनिधी: खेड भरणे येथे आषाढी एकादशी



निमित्त बुधवार दिनांक १७ जुलै २०२४ रोजी खेड तालुका वारकरी सांप्रदाय मंडळ भरणे यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करणात आले होते. इन्फिगो आयकेअर यांच्या सहकार्यातून दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचे मोफत नेत्रतपासणी शिबिर घेण्यात आले होते . या वेळी सर्व वारकरी सांप्रदाय उपस्थित होते. शिबिरामध्ये ९० पेक्षा अधिक वारकरी भाविकांनी या सुविधेचा लाभ घेतला . शिबिरासाठी वारकरी सांप्रदाय अध्यक्ष प्रकाश जाधव आणि महाराज गणपत येसरे यांची उपस्थिती होती कार्यक्रमावेळी त्यांनी चांगले मार्गदर्शन दिले.

## अलिबाग बाजार पेठ मध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:

आषाढी एकादशी निमित्त अलिबाग बाजारपेठ मधील लोकांनी महाराष्ट्राला लाभलेल्या संस्कृतीचा वारशाचे जतन करत आषाढी एका दशी निमित्त दिंडीचे आयोजन केले होते ताल व मृदंगाच्या तालात




हे दिंडी अलिबाग मध्ये फिरवून ती वरसोली विठ्ठल मंदिर येथे आणण्यात आली दिंडी करत असताना अलिबाग मधील लोकांना प्रसाद सुद्धा वाटण्यात आला हे दिंडीचे चौथे वर्ष आहे व या दिंडीसाठी सुमारे ६० लोक होती व या दिंडीत अलिबाग फोटोग्राफर असोसिएशन सुद्धा समाविष्ट झाले होते व दिंडीची सांगता ही सर्वांना खिचडीचा फराळ देऊन करण्यात आली व सर्वांच्या मनात एक भक्ती भावाचा वातावरण निर्माण झालं होतंङ्गव दिंडी मोठ्या उत्साहात पार पडली व पुढल्या वर्षी पाचवे वर्ष हे मोठ्या उत्साहात दिंडीचे आयोजन करण्यात येणार आहे असे सांगण्यात आले

# दि.शंकर धोंडू साळवी यांच्या स्मृतिदिनी शालेय विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप व खुल्या काव्य स्पर्धेचा निकाल

दि.शंकर धोंडू साळवी यांच्या प्रथम स्मृतिदिनी दिनांक १७ जुलै २०२४ रोजी बुध्दांकुर बुद्धविहार वलंग येथे न्यू इंग्लिश स्कूल वलंग,प्राथमिक शाळा वलंग आणि प्राथमिक शाळा आदिस्ते येथील एकूण ३० गरजू शालेय विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. तसेच बाबा या विषयावर आयोजित खुल्या ऑनलाईन काव्यस्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. महाराष्ट्र व गोवा राज्यातून उत्तम प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेत एकूण ७८ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. खूप दर्जेदार ठरलेल्या या



काव्यस्पर्धेत सौ लक्ष्मी पांडुरंग महात्मे(पणजी - गोवा) यांना प्रथम,श्री सिद्धेश लखमदे(मुरुड जंजिरा) यांना द्वितीय,श्री पद्माकर भावे (अंबरनाथ ठाणे) यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाले. तर श्री मारुती सकपाळ (पारमाची महाड) आणि डॉ मानसी पाटील (मुंबई) यांना उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाले. अनुक्रमे रु . ७०० , ५००,३००,१००,१००,ही पारितोषिकाची रक्कम गुगल पे च्या साहाय्याने विजेत्यांच्या खात्यात जमा करण्यात आली. तसेच आकर्षक सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. अनेक स्पर्धकांनी या काव्यस्पर्धा आयोजनाबद्दल आपल्या चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. तर बाबांच्या स्मृतिदिनी शालेय विद्यार्थ्यांना छत्र्यांचे केलेले वाटप व आयोजित केलेल्या काव्यस्पर्धा या स्तुत्य उपक्रमाबद्दल आयोजक श्री निरंजन शंकर साळवी,दशरथ शंकर साळवी आणि गंगाधर शंकर साळवी या बंधूंचे अभिवादन सभेच्या भाषणात अनिल यशवंत जाधव,विजय साळवी गुरुजी,सखाराम जाधव, बंडूशेठ देशमुख,अश्विनी घरटकर यांनी विशेष कौतुक केले. वडिलांच्या स्मृतिदिनी आयोजित केलेला हा उपक्रम समाजासाठी आदर्शवत असल्याचे ते यावेळी म्हणाले. छत्र्या प्राप्त झालेल्या मुलांच्या चेहऱ्यावर हसू दिसत होते. सचिव सुदेश साळवी यांनी सूत्रसंचालन केले. वलंग बौद्धजन संघ ग्रामीण,महिला मंडळ,तरुण मंडळ व आप्तेष्ट मंडळी यावेळी उपस्थित होते.

# शिवसेना मंडणगड तालुका प्रमुख प्रतापजी घोसळकर यांनी आदिवासी महिला भगिनींसाठी घेतली तहसीलदार यांची भेट...


मंडणगड प्रतिनिधी शिवसेना मंडणगड तालुका प्रमुख प्रतापजी घोसाळकर यांची आज भिंगळोली आदिवासी वाडी येथिल महिलांनी भेट घेतली व त्यांचे रेशन कार्ड वर नाव आजतागयत नाही हि समस्या मांडली प्रशासनाकडे गेल्यावर भरमसाठ कागद पत्रांची यादी मागत आहेत पोस्ट खाते खोलायला गेल्यावर अनेक अडचणी निर्माण होत आहेत अश्या अनेक समस्या या महिलांनी प्रतापजी घोसाळकर यांना सांगितल्या.ङ्गङ्ग शिवसेना मंडणगड तालुका प्रमुख प्रतापजी घोसाळकर यांनी आदिवासी महिला भगिनी यांची समस्या ऐकून घेतली व त्वरीत त्यांच्यसमवेत तहसिलदार साहेब श्रीधर गालीपिल्ली यांची भेट घेतली त्यांना सर्व या महिला भगिनी यांची समस्या सांगितली.ङ्गङ्ग तहसिलदार साहेब यांनी त्वरीत संबंधीत अधिकारी यांना संपर्क करून साध्या पेपरवरच प्रतिज्ञापत्र करण्याचे आदेश दिले तसेच पोस्ट अधिकारी यांना देखिल झिरो बॅलन्स चे खाते काढूनच या भगिनींन देण्यात यावे अशा सर्व संबंधीत अधिकारी वर्ग यांना सुचना दिल्या.. गेले कित्येक वर्ष रेशन कार्ड नसलेल्या आदिवासी माता भगिनी यांना रेशन कार्ड शिवसेना मंडणगड तालुका प्रमुख प्रतापजी घोसाळकर यांच्या प्रयत्नाने तहसिलदार साहेब यांच्या कडे मांडलेल्या कैफीयत यामुळे मिळणार आहे त्या बद्दल आदिवासी भगिनी माता यांनी शिवसेना मंडणगड तालुका प्रमुख प्रतापजी घोसाळकर साहेबांचे आभार मानले.. शिवसेना विभाग प्रमुख संजयजी शेडगे देखिल उपस्थित होते.



## वारळ गावचा निष्ठावंत शिवसैनिक हरपला

द. रा. जि. प्रतिनिधी:

संतोष उध्दरकर.म्हसळा: जुलै रोजी म्हसळा तालुक्यातील वारळ गावचे निष्ठावंत शिवसैनिक, शाखाप्रमुख व आदिवासी लोकांचा एक रोजगार दाता म्हणुन ज्यांची ओळख होती असे हरिचंद्र महादेव खोत यांचे १६ जुलै रोजी राहत्या घरी दुखद निधन झाले, एक रोजगार दाता, निष्ठावंत शिवसैनिक व शाखाप्रमुख यांचे दुखद निधन झाल्याने संपूर्ण वारळ गावात व तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. १९८३ साली प्रथम शिवसेनेची सभा हरिचंद्र खोत यांच्या घरी घेण्यात आली होती तेव्हा पासुन आज पर्यत खोत हे वारळ गावचे शाखा प्रमुख कार्यरत होते, वारळ गावासह तेथील पंचक्रोशितील वाडीवस्ती वर शिवसेना वाढविण्यासाठी खोत यांनी खुप मेहनत घेतली होती. हरिचंद्र खोत एक व्यवसाईक होते. मासेमारी हा देखील त्यांचा व्यवसाय होता, समाजसेवा करताना खोत यांनी अनेकांना एक हात मदतीचा दिला होता. वारळ या ठिकाणच्या



आदिवासी लोकांचा तर ते दाता म्हणुन परिचित होते. हरिचंद्र खोत यांच्या जाण्याने शिवसेनेमध्ये नक्कीच कमतरता जाणवेल,समस्थ शिवसैनिक खोत यांच्या परिवाराच्या दुखात सहभागी आहोत असे शिवसेना उ. बा. ठा. पक्षाचे द.रा. उप जिल्हा प्रमुख नंदु शिर्के यांनी उद्गार काढले व जड अंतकरणाने हरिचंद्र खोत यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी समस्थ वारळ गावचे ग्रामस्थ, आदिवासी समाज बांधव तसेच तालुक्यातील अनेक शिवसैनिकांनी हरिचंद्र खोत यांचे अंतिम दर्शन घेऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली, हरिचंद्र खोत यांच्या पश्चात मुल, मुली, पत्नी, आई, भाऊ असा परिवार आहे.

## रास्तभाव धान्य दुकान व किरकोळ केरोसीन परवान्यासाठी इच्छुकांनी ३१ जुलैपर्यंत अर्ज करावेत

रत्नागिरी, (जिमाका) : जिल्ह्यातील रिक्त असलेल्या, राजीनामान्यने रिक्त झालेल्या व नव्याने मंजुरी देण्याच्या रास्तभाव धान्य दुकान व किरकोळ केरोसीन परवाने यासाठी आपल्या नजिकच्या तहसील कार्यालयात इच्छुकांनी ३१ जुलै पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी रोहिणी रजपूत यांनी केले आहे. मंडणगड तालुक्यात ९, दापोलीत १२, खेड ९, गुहागर १३, चिपळूण ९, संगमेश्वर २, रत्नागिरी ३, लांजा २, राजापूर १० असे एकूण ६९ असे एकूण रास्तभाव धान्य दुकान व किरकोळ केरोसीन परवाने मंजुरीकरिता जाहीरनामे काढण्यात आले आहेत. जाहीरनाम्यानुसार संबंधित तालुक्यातील इच्छुक ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था व महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या संस्था यांनी ३१ जुलै २०२४ पर्यंत संबंधित तहसिलदारांकडे आपले अर्ज सादर करावेत. अर्ज फी रु.१०/ - असून अर्जाचा नमुना तहसिलदार कार्यालयात उपलब्ध आहे. मुदतीत व परिपूर्ण कागदपत्रांसह दाखल झालेल्या प्रस्तावांचाच विचार केला जाणार असून मुदतीनंतर व अपुऱ्या कागदपत्रासह प्राप्त होणारे प्रस्तावा विचारात घेतले जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

पुणे विभागीय कार्यालय पत्ता : बालाजी नगर [illegible] बँक शेजारी कुडाळकर क्लास पहिला मजला पुणे जिल्हा कार्यालय दैनिक सूर्योदय - अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती), संपर्क : ९६२३२३०४२६

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )